सकाळ

# डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे उद्या होणार व्याख्यान

## आंतरराष्ट्रीय जलदिनानिमित्त विद्यापीठात आयोजन



डॉ. राणा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अॅन्ड इंजिनिअर्सतर्फे 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय जलदिनानिमित्त बुधवारी (ता. २७) सकाळी साडेदहा वाजता जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विशेष व्याख्यान होईल. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल उपस्थित राहतील. 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या मोहिमेअंतर्गत जयंती नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने अभ्यास सुरू असून जयंती नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. डॉ. राजेंद्रसिंह यांनी जगभर पाणी व्यवस्थापन मोहिमेअंतर्गत जनजागृती केलेली आहे. नॅशनल गंगा रिव्हर बेसिन अॅथॉरिटीच्या माध्यमातून गंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. महापुरामुळे नदीच्या काठावरील धूप थांबविण्यासाठी व पूरनियंत्रणासाठी युनायटेड किंगडमच्या फ्लो पार्टनरशिप या संस्थेच्या माध्यमातून ते काम करीत आहेत. व्याख्यानातून पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी ते उपाय योजना सुचविणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पी.डी. राऊत, अजय कोराणे यांनी केले आहे.

# डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे उद्या व्याख्यान

## 'जागे व्हा पंचगंगेसाठी' अभियानासाठी मार्गदर्शन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अॅन्ड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा पंचगंगेसाठी' या अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त दि. २७ रोजी सकाळी १०.३० वाजता जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. यावेळी कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल उपस्थित राहणार आहेत.

'जागे व्हा पंचगंगेसाठी' या मोहिमेंतर्गत जयंती नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने अभ्यास सुरू असून जयंती नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जयंती नदीतील दूषित पाणी प्रक्रिया करून पुनर्वापर करणे व दूषित पाणी प्रक्रिया करूनच जयंती नदीमध्ये सोडले जावे, यासाठी असोसिएशनमार्फत उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर रहिवासी विभागातील दूषित सांडपाणी व औद्योगिक क्षेत्रातील रसायनमिश्रित, दूषित पाणी नदीमध्ये मिसळू नये यासाठी महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन, शिवाजी विद्यापीठ यांसारख्या घटकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.

डॉ. राजेंद्रसिंह यांनी जगभर पाणी व्यवस्थापन मोहिमेंतर्गत जनजागृती केलेली आहे. नॅशनल गंगा रिव्हर बेसिन अॅथॉरिटीच्या माध्यमातून गंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. ते या व्याख्यानातून जयंती नाला व पर्यायाने पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणार आहेत. या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अॅन्ड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी केले आहे.

पुढारी

# डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त बुधवारी (दि. २७) सकाळी १०.३० वाजता जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत व असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी केले आहे.

'जागे व्हा पंचगंगेसाठी' या मोहिमेअंतर्गत जयंती नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने अभ्यास सुरू असून जयंती नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जयंती नदीतील दूषित पाणी प्रक्रिया करून पुनर्वापर करणे व दूषित पाणी प्रक्रिया करूनच जयंती नदीमध्ये सोडले जावे, यासाठी असोसिएशनमार्फत उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. तसेच डॉ. राणा व्याख्यानातून जयंती नाला व पर्यायाने पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी ते उपाययोजना सुचविणार आहेत.

26 MAR 2019

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकसत्ता

# समीक्षक म. सु. पाटील कुटुंबीय, शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पुरस्कार

प्रतिनिधी, कोल्हापूर

**ख्यातनाम समीक्षक** व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. म. सु. पाटील यांचे कुटुंबीय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दर दोन वर्षांनी 'डॉ. म. सु. पाटील पुरस्कार' दिला जाणार आहे.

म. सु. पाटील हे मराठीतील नामवंत समीक्षक असून मनमाड (खानदेश) महाविद्यालयात त्यांनी दीर्घकाळ प्राचार्य म्हणून काम केले आहे. त्यांचे आजवर दहाहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मराठी समीक्षा लेखनपरंपरेत त्यांनी केलेली समीक्षा मूलभूत स्वरूपाची आहे. त्यांच्या ग्रंथांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी मांडलेला 'तृष्णाबंध साहित्यविचार' हा भारतीय साहित्यशास्त्रात महत्त्वाचा गणला गेला आहे. या पुरस्कारासाठी पाटील कुटुंबीयांच्यावतीने पाच लाख रुपये विद्यापीठाचे प्रा. कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. या देणगी रकमेच्या व्याजातून पुरस्कार दिला जाणार असल्याचे गुरुवारी सांगण्यात आले. पाटील कुटुंबीयांपैकी कवयित्री नीरजा, शंकर अय्यर, तृप्ती शंकर, अनुराधा मोकल, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, प्राचार्य कणस हे उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त बुधवारी (दि. २७) सकाळी १०.३० वाजता जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत व असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी केले आहे.

'जागे व्हा पंचगंगेसाठी' या मोहिमेअंतर्गत जयंती नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने अभ्यास सुरू असून जयंती नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जयंती नदीतील दूषित पाणी प्रक्रिया करून पुनर्वापर करणे व दूषित पाणी प्रक्रिया करूनच जयंती नदीमध्ये सोडले जावे, यासाठी असोसिएशनमार्फत उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. तसेच डॉ. राणा व्याख्यानातून जयंती नाला व पर्यायाने पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी ते उपाययोजना सुचविणार आहेत.

My Kolhapur Edition
26 Mar, 2019 Page No. 3
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठातर्फे उद्या 'तुका झालासे कळस' व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने बुधवारी (दि. २७) सायंकाळी ५ वाजता दसरा चौकातील शाहू स्मारक भवनाच्या मिनी सभागृहात 'तुका झालासे कळस' या विषयावर संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे (नाशिक) यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस व अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
26 Mar, 2019 Page No. 8
Powered by : erelego.com